मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




## विकास कामांच्या आधारावर सुवर्णाताई बुर्डे यांना पुन्हा संधी मिळण्याचा विश्वास

# प्रभागाचा शाश्वत विकास; हा माझा ध्यास

**विकसनशील प्रभाग : 03**



**माझा प्रभाग माझा उमेदवार!**

**पिंपरी | प्रतिनिधी :** माहेरी राजकीय संस्कारांचा आणि सासरी सामाजिक कार्याचा वारसा लाभलेल्या सुवर्णाताई बुर्डे यांनी दूरदृष्टी आणि कार्यनिष्ठेच्या बळावर नगरसेविका म्हणून कार्य करताना २०१७ ते २०२२ या काळात चऱ्होली परिसराच्या विकासात मोलाचे योगदान दिले. आमदार महेशदादा लांडगे, महापौर नितीन आप्पा काळजे आणि सचिनभाऊ तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी प्रभागातील विविध प्रकल्प यशस्वीपणे राबवले. दिवसेंदिवस झपाट्याने वाढत जाणाऱ्या चऱ्होलीच्या सोयी-सुविधांना बळकटी देण्यासाठी मतदारांनी पुन्हा एकदा विश्वास दाखवून संधी द्यावी, अशी साद नगरसेविका सुवर्णाताई विकास अण्णा बुर्डे यांनी घातली आहे.

## यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली...

पूर्वी ग्रामीण ओळख असलेल्या चऱ्होली परिसराने आता झपाट्याने शहरी विकास साधत एक विकसनशील क्षेत्र म्हणून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. रस्ते, दळणवळण, आरक्षित जागांचे प्रकल्प आणि मूलभूत नागरी सुविधांच्या विकासाद्वारे येथे सर्वसमावेशक प्रगतीचा पाया घालण्यात सुवर्णाताईंनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## महिला सक्षमीकरणासाठी सत्कार्य

समाजातील प्रत्येक घटकासाठी काम करताना विशेषतः महिलांच्या सक्षमीकरणावर त्यांनी भर दिला. बचत गटांच्या माध्यमातून सुमारे दीड हजार महिलांना मार्गदर्शन करून त्यांना आर्थिकदृष्ट्या सबळ बनवण्याचा उपक्रम राबवला. महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी नोंदणीपासून प्रत्यक्ष सहकार्यापर्यंत सर्वतोपरी मदत करण्यात आली. महिलांच्या आत्मविश्वासास आणि प्रतिभेला वाव मिळावा या उद्देशाने चऱ्होली फॅशन शोचे आयोजन करण्यात आले. त्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादातून समाजातील महिलांमध्ये नवीन आत्मभान आणि आत्मसन्मानाची भावना निर्माण झाली.





## विविध योजनांचा नागरिकांना लाभ मिळविण्यास मदत

केंद्र व राज्य शासन तसेच महानगरपालिकेच्या विविध समाजाभिमुख योजना, आभा कार्ड, आयुष्मान भारत योजना, महात्मा फुले जन आरोग्य योजना, समृद्धी योजना, सुकन्या योजना आणि मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आदी योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. अनेकांना योजनेची माहिती देऊन प्रत्यक्ष लाभ मिळवून दिला. समाज बांधणीसाठी गाव चलो अभियान आणि भारतीय जनता पक्ष सदस्य नोंदणी अभियानही उत्साहाने राबवले.

> "विकासाची गती कायम ठेवण्यासाठी अनुभवी आणि जनतेशी नाळ जुळवणारा प्रतिनिधी असणे गरजेचे आहे. म्हणूनच जनतेने पुन्हा एकदा माझ्यावर विश्वास दाखवून सेवा करण्याची संधी द्यावी."
>
> \- सुवर्णाताई बुर्डे

## या कामांना देणार गती

- सुवर्णाताईंच्या मते, प्रलंबित राहिलेल्या कामांना गती देणे आणि नवनवीन उपक्रम हाती घेणे ही पुढील काळातील प्राथमिकता आहे.
- ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, नाना नानी पार्क, मुलांसाठी मैदान त्यासाठी आरक्षणांचा विकास करणे, महिलांसाठी प्रशिक्षण केंद्र आणि विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका ज्यामध्ये स्पर्धा परीक्षा केंद्राचाही समावेश असेल अशी उपक्रम त्यांनी आराखड्यात ठेवली आहेत.



## यामुळे सुटणार प्रश्न...

या परिसरातील पाणीपुरवठ्याचा दीर्घकालीन प्रश्न सोडवण्यासाठी आमदार महेशदादा लांडगे यांनी पुढाकार घेत नवीन पाण्याच्या टाक्या बसवल्या आहेत. या टाक्या पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यावर चऱ्होलीतील पाणीटंचाईचा प्रश्न कायमचा सुटेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

## तीन हजार भाविकांना उज्जेन, ओंकारेश्वरचे दर्शन घडविले

- प्रभागातील अनेक महिलांची इच्छा होती, उज्जेन, ओंकारेश्वर या ठिकाणी दर्शन घडावे यासाठी, मात्र अनेकींची आर्थिक स्थिती, शारिरीक स्थिती व्यवस्थित नसल्याने इच्छा मनात ठेवली होती.
- त्यांच्या भावना लक्षात घेऊन प्रभागातील सुमारे तीन हजार महिलांसाठी धार्मिक यात्रेचे व्यवस्थितरित्या आयोजन करून ही धार्मिक यात्रा यशस्वी केली. त्यांना संवाद, श्रध्दा आणि सहकार्याचा सुंदर अनुभव त्यांनी दिला.